धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________________ दिनांक : ०५/०३/२०१६

<u>प्रसिध्दीकरिता</u>

# आदिवासी विद्यार्थिनींना मिळणार सुरक्षित वसतीगृह

## ‘धर्मराज्य पक्षा’च्या लढ्याला यश

**<u>ठाणे (प्रतिनिधी), दि. ५</u>** : अतिशय प्रतिकूल परिस्थितीत ज्ञानार्जनाचे कर्तव्य पार पाडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आयुष्यात हाल-अपेष्टांनी भरलेले प्रसंग अधिक असतात हे समिकरण ठरलेले असतांनाच, ठाण्यातील शासकीय आदिवासी वसतीगृहात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींच्या वाट्यालादेखील राजकीय उदासिनता आणि प्रशासकीय कामचुकारपणामुळे हाल-अपेष्टांसोबत धोकादायक जगणं वाट्याला आले आहे. ठाणे शहराच्या पूर्वेकडील असलेल्या कोपरी परिसरात साईनाथ कृपा या इमारतीमधील सातव्या मजल्यावर महाराष्ट्र शासनाचे आदिवासी मुलींसाठीचे वसतीगृह आहे. मात्र, हे वसतीगृह म्हणजे प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा संतापजनक पुरावा असून, गेल्या ४ वर्षापासून जीव मुठीत धरून, मुली शिक्षण घेत आहेत. ठाणे महानगरपालिकेने धोकादायक म्हणून ही इमारत जाहीर केलेली असतांनादेखील विद्यार्थिनींच्या सुरक्षितेबाबत प्रशासकीय व्यवस्थेकडून कोणतीही पाऊले उचलली गेली नाहीत. गळणारे छत, भिंतींना आणि पिलर्सला गेलेले तडे, त्यातच कायमस्वरूपी बंद असलेली लिफ्ट अशी परिस्थिती असतांनाच, ६ ऑक्टोबर-२०१५ रोजी, सायंकाळी ५.०० वा.च्या सुमारास वसतीगृहाच्या छताचा काही भाग कोसळून, त्यात **भावना भुसार** नावाची १२ वीत शिकणारी विद्यार्थिनी जखमी झाली होती. या पार्श्वभूमीवर **‘धर्मराज्य पक्षा’**ने या दुर्घटनेची गांभीर्याने दखल घेत शासनदरबारी पाठपुरावा सुरू केला होता. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाकडे याबाबत पत्रव्यवहार केला होता. मानवी हक्क आयोगाने त्याची गांभीर्याने दखल घेत, कोपरीतील ठाणे महानगरपालिकेच्या १६ क्रमांकाच्या शाळेत या विद्यार्थिनींना निवासाची व्यवस्था तसेच, शाळेच्या इमारतीमध्येच स्नानगृह व शौचालय बांधून देण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान, **‘धर्मराज्य पक्षा’**चे ठाणे लोकसभा अध्यक्ष राजेश गडकर आणि सचिव विनोद मोरे यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळेच आदिवासी विद्यार्थिनींना न्याय मिळालेला असून, **‘धर्मराज्य पक्षा’**च्या लढ्याला यश आले आहे. शासकीय आदिवासी वसतीगृहाच्या वॉर्डन जीजा पाडवी यांच्या सांगण्यानुसार, गेल्या तीन ते चार वर्षांपासून वसतीगृह सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी अनेक विनंती पत्र पाठविण्यात आली होती. त्यानंतर आदिवासी विकास मंत्री विष्णू सावरा यांनी वसतीगृहाला अचानक भेट देऊन, आदिवासी मुलींचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. मात्र, त्यानंतर कोणतीही ठोस पाऊले शासनाकडून उचलली गेली नाहीत. या पार्श्वभूमीवर **‘धर्मराज्य पक्षा’**ने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाकडे सातत्याने पाठपुरावा करून, आदिवासी विद्यार्थीनींना सुरक्षित आयुष्याबरोबरच, सुरक्षितपणे शिक्षण घेण्याचा हक्क मिळवून दिला आहे.

-----@@@-----

ए/एर०३, 'पांचजन्य'-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस् को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२, ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, 'पांचजन्य', शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग, द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०. दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*“सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!”...*